# पोलीस अधीक्षक कार्यालय,वजिराबाद चौक नांदेड

EMAIL ID:- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com


**प्रेसनोट** दिनांक–13.11.2025

## सिटी स्ट्रिट सेफ्टी पथक यांची सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन शांतता भंग करणारे इसमांवर धडक कारवाई..

**मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांनी नांदेड शहरातील सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी स्थापन केलेल्या नांदेड सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकाने **मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री सुरज गुरव**, अपर पोलीस अधीक्षक नांदेड यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख **सपोनि श्री भागवत नागरगोजे** व चार्ली पोलीस अंमलदार यांनी दिनांक 11,12 नोव्हेंबर 2025 रोजी नांदेड शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करणारे इसमांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**1) पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण :–** सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक तीन मधील पोलीस अंमलदार यांना एम.आय.डी.सी येथे 02 इसम हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

**2) पोलीस स्टेशन वजिराबाद :–** सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक,दोन,तीन मधील पोलीस अंमलदार यांना बसस्टॅंड,कलामंदिर,मल्टीपर्पझ येथे 03 इसम हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

**3) पोलीस स्टेशन इतवारा :–** सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक दोन,तिन मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान हबीब टॉकीज,जुना मोंढा येथे 03 इसम हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

**4) पोलीस स्टेशन विमानतळ :–** सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक दोन,तिन मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान नमस्कार चौक,माळटेकडी ब्रिज येथे 04 इसम हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच नाईक चौक रोडवर एक फटाका बुलेट मिळून आल्याने वाहनावर 1000/– रू.चा दंड आकारण्यात आला आहे तसेच नाईक चौक येथे 01 इसम दारू पिणेसाठी ग्लास,पाणी पाऊच ची विक्री करत असताना मिळून आल्याने त्याचेवर पोलीस स्टेशन विमानतळ येथे महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम 68 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

**5) पोलीस स्टेशन भाग्यनगर :–** सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील सपोनि नागरगोजे व चार्ली क्रमांक एक मधील पोलीस अंमलदार यांना अशोक नगर,वर्कशॉप येथे 02 इसम हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच शेतकरी चौक रोडवर एक विना परवाना वाहन मिळून आल्याने वाहनावर 2000/–रू.चा दंड आकारण्यात आला आहे तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले. तसेच छत्रपती चौक येथे 01 इसम अवैध दारूची विक्री करत असताना मिळून आल्याने त्याचेवर पोलीस स्टेशन भाग्यनगर येथे महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम 65 (इ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

**6)दामिनी पथक :–** दामिनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्याण सिडको, विसावा गार्डन येथे 05 इसम हे आरडाओरड करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळुन आल्याने त्यांचेवर पो स्टे शिवाजीनगर, नांदेड ग्रामीण येथे कलम 110/117 म.पो.का. प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

**मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांनी नांदेड शहरात कोणीही सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊ नये तसेच दारू पिणाऱ्यासाठी जागा उपलब्ध करून देवू नये व सार्वजनिक शांततेचा भंग करू नये अन्यथा संबधीत इसमांवर कडक कारवाई करण्यात येईल असे आवाहन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड